# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna

दिनांक २२/०३/२०२०

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि-

(ई-मेलने/टपालाने)

आपत्ती प्राधान्य

**वाचा:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १३/०३/२०२०.
४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १४/०३/२०२०.
५) या कार्यालयाचे आदेश जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २०/०३/२०२०.

**सुधारीत आदेश**

ज्या अर्थी, राज्यात कोरोना विषाणुमुळे (nCoV 19) उदभवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थीती निर्माण झाली आहे व या विषाणुमुळे उदभवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्मान झाल्यामुळे राज्यात महाराष्ट्र शासनाने साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २, ३ व ४ ची अंमलबजावणी संदर्भ क्र.४ च्या अधिसुचनेच्या दिनांकापासुन सुरु करण्याचे निर्देशीत केले आहे.

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र.३ च्या अधिसुचने अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० लागू केले आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हयात कोरोना विषाणुच्या (COVId-19) प्रादुर्भावास किंवा प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमीत करण्यात आलेली अधिसुचना व महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० नियमावली मधील तरतुदीनुसार जिल्हयातील नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जालना जिल्हयामध्ये सभा, मेळावे, उपोषण, सामाजिक, सांस्कृतीक, राजकिय, धार्मीक, क्रिडा विषयक कार्यक्रमांना बंदी घालणे आवश्यक आहे तसेच नगर पालीका, नगरपंचायत व नगरपालीका व नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या क्षेत्रातील आणि जिल्हयातील सर्व ग्रामीण क्षेत्रातील सर्व हॉटेल्स, धाबे, रिसॉर्ट, फार्म आऊस, रेस्टॉरन्ट, लॉजिंग, आईस्क्रीम पार्लर, सर्व प्रकारची शीत पेयांचे गाडे व दुकाने (उदा.लिंबू सरबत, बर्फाचे गोळे, आईसकँडी, उसाच्या रसाची गुराळे इत्यादी सर्व) तसेच सर्व प्रकारचे खाद्य पदार्थांचे गाडे (उदा.चहा,वडा/भजीपाव, चायनीज, पाणी पुरी इत्यादी सर्व) [अत्यावश्यक किराणा (Grocery), दुध व भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तू व औषधालय (Chemist Shop) वगळून] दिनांक ३१ मार्च २०२० अखेर पूर्णपणे बंद करणेत येत आहेत.

सदर आदेश ध्वनीक्षेपकावर पोलीसांनी जाहीर करुन त्यास प्रसिध्दी करावी असेही आदेशीत करीत आहे.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

Ravindra Laxman Binwade

Digitally signed by Ravindra Laxman Binwade
Date: 2020.03.22 19:36:29 +05'30'

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

**प्रत — आवश्यक व माहीतीस्तव कार्यवाहीस्तव**

१. पोलीस अधिक्षक, जालना.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना.
३. उपविभागीय अधिकारी, जालना/अंबड/परतुर/भोकरदन.
४. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, जालना.
५. तहसीलदार, जालना/बदनापुर/अंबड/घनसावंगी/परतुर/मंठा/भोकरदन/जाफ्राबाद.
६. गट विकास अधिकारी,जालना/बदनापुर/अंबड/घनसावंगी/परतुर/मंठा/भोकरदन/जाफ्राबाद.
७. मुख्याधिकारी, न.प./न.पं. जालना/बदनापुर/अंबड/घनसावंगी/परतुर/मंठा/भोकरदन/जाफ्राबाद.
८. जिल्हा माहीती अधिकारी, जालना यांना देवुन आदेशीत करण्यात येते की, वरील आदेश वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करावा.